# Campus Placement 2015-16 News 1/05/2016

**प्रा.राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅन्ड रिसर्च बडनेरा**

## कॅम्पस प्लेसमेंट २०१५–१६ मध्ये ३१२ विद्यार्थ्यांची गरुड भरारी



अमरावती: **विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेच्या** परंपरेनुसार यंदा ३१२ विद्यार्थ्यांना विविध मल्टी नॅशनल कंपन्यांमध्ये स्थान प्राप्त झाल्याचे सर्वविदीत आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी घेऊन बाहेर पडतांनाच आपल्या हाती एक चांगल्या पगाराची सुरक्षित नोकरी असावी हे प्रत्येक युवकाचे स्वप्न असते. हे स्वप्न प्रत्यक्षात येऊन अनेकांच्या हाती ३.५ लाखापेक्षा जास्त पॅकेज असलेले बघून युवा अभियंत्यांमध्ये आनंदाची लाट आलेली आहे. यंदा वर्षभर सुरू असलेल्या विविध कंपन्यांच्या प्लेसमेंट प्रक्रियेमध्ये निवड झालेल्या ३१२ विद्यार्थ्यांना एका विशेष समारोहात महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. निशिकांत काळे** यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या प्रसंगी सर्व विभाग प्रमुख आणि प्लेसमेंट विभागाचे प्रभारी प्राध्यापक प्रा. रवि हिरूळकर, प्रा. श्रीकांत देशमुख, डॉ. ए. डी. शिरभाते, प्रा. मिलिंद मोहोड, प्रा. अनुप बुरंगे, प्रा. संग्राम दांडगे, स्मित ठाकूर, प्रफुल्ल बागडे, निनाद गावंडे, देवेंद्र बांडाबुचे व प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. तुषार देशमुख हे उपस्थित होते.

भारतातील अग्रगण्य तंत्र शिक्षण संस्था म्हणून लौकिक मिळविलेल्या प्रा. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता उद्योगांना उपयोगी पडेल असे अभियंते निर्माण करण्याचे धोरण अवलंबिले आहे. गत ३३ वर्षातील सुमारे पंधरा हजार पेक्षा जास्त माजी विद्यार्थी आज उद्योग जगतात विविध उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यांचा महाविद्यालयाशी सतत संपर्क असतो व या द्वारे उद्योग जगत आणि शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न येथे होत असतो.

टी. सी. एस. कंपनीत निवड झालेल्या १०८ विद्यार्थ्यांचे निवडीत मुख्यत्वे नेहा दुधे, जतनकुमार सेदानी, राशी धांडे, कौतुक मुंधडा, कार्तिकी शेंदुरकर, प्रियंका संत, अभिजित, निखिल पुसतकर व इतर विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना म्हटले की, आमच्या महाविद्यालयाने दर्जेदार शिक्षण सुविधा उपलब्ध करून देऊन आयुष्यभर पुरेल असा ज्ञानाचा ठेवा आम्हाला दिला असे प्रतिनिधीला सांगितले. महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना सरकारतर्फे, महाविद्यालया तर्फे अथवा अ‍ॅल्युम्नी असोसिएशन तर्फे शैक्षणिक सवलत मिळत असल्यामुळे सर्वसामान्य मध्यमवर्गीय देखील येथे शिक्षण घेऊ शकतो याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

पर्सिस्टंट कंपनीत निवड झालेल्या अहमर मलीक खान, के. पी. आय. टी. कंपनीत अर्पिता वानखडे, दर्शना आखरे, गौरव जोशी व इतर गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाने आमच्या सर्वांगीण विकासासाठी जे प्रयत्न केले त्यामुळेच आम्हाला हे यश मिळविता आले अशा भावना विद्यार्थ्यांनी समारोप सोहळ्याप्रसंगी व्यक्त केल्या.

तसेच कॅंप जेमिनी कंपनीत वृषाली भडके, अमिता जोशी, तर त्रिवेणी टर्बाइन्स मध्ये अभिजित धंदर, इंडस इंड बॅंकेत अक्षय पुसे, पूनम आमले, व इतर विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय अनुभवी अध्यापक वृंद, तसेच महाविद्यालयाच्या रोजगार पूरक नियोजनं व्यवस्थेला देत असतांनाच महाविद्यालयासोबत शिक्षण संस्थेचे विशेष आभार मानले.

त्याचप्रमाणे एल अ‍ॅंड टी इन्फोटेक कंपनीत निवड झालेल्या शिवराज देशमुख, स्नेहल बंड, आरती नागे व इतर आणि पोलॅरिस कंपनीत निवड झालेल्या दोरेन खर्मावलॉंग, सायली आंबेकर व इतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून तज्ञ व अनुभवी शिक्षकांद्वारे मिळणारे योग्य मार्गदर्शन व महाविद्यालयाने जाणीवपूर्वक जोपासलेला उद्योग जगतासोबतचा सहसंबंध यामुळेच ह्या रोजगाराच्या सुसंधी प्राप्त करता आल्याचे मनोगत व्यक्त केले.

टाटा मॅन्युफॅक्चरींग लिमिटेड या कंपनीत संकेत वांजळे, हरित कुळकर्णी, श्रद्धा बडोणे, जस्ट डायलचे हृषिकेश केदार, आकाश जवंजाळ, केवल दोशी, विक्रम भटकर, अक्षय फुसे तसेच या सर्व विद्यार्थ्यांना निरोप देण्याच्या सोहळ्या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. निशिकांत काळे** यांनी नमूद केले की, चांगल्या कंपन्यांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड व्हावी म्हणून महाविद्यालय आपल्या विद्यार्थ्यांवर चार वर्षे नियोजनपूर्वक मेहनत घेतांनाच त्यांना अद्ययावत शैक्षणिक सेवा सुविधा पुरवित सर्व आवश्यक संधी देऊन, विविध कार्यशाळांचे माध्यमातून उद्योग जगतास पूरक अशी मानसिकता, वृत्ती अंगी बाणविण्याकरिता तसेच आवश्यक कौशल्ये संपादनाकरिता शक्य ती सर्व मदत करीत असते. या सर्व पुण्याईचा परिपाक म्हणून या वर्षीचा **आय.एस.टी.ई. भारतीय विद्याभवन नॅशनल अवॉर्ड फॉर बेस्ट इंजिनिअरींग कॉलेज हॅविंग बेस्ट ओव्हरऑल परफॉर्मन्स फॉर द ईअर २०१५** या सर्वोच्च बहुमानाने गौरविल्या जाण्याचा बहुमान प्राप्त झाला.

सर्व सामान्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत मिळवून देऊन त्यांच्यावर आर्थिक बोजापोटी शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ नये याबाबत महाविद्यालय सदैव दक्ष असते. महाविद्यालयात शिकणाऱ्या ८५% विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात भरीव सवलत मिळत असते. त्यामुळे सर्वसाधारण परिस्थितीतील पण हुशार होतकरू विद्यार्थ्यांचा ओघ महाविद्यालयाकडे वाढलेला दिसून येत आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून आज ५०३४ विद्यार्थी ज्यामध्ये १४३७ मुलींचा समावेश आहे.

या प्रसंगी अधिक माहिती देतांना प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. तुषार देशमुख यांनी विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी भारतातील नामवंत शिक्षण संस्थांची मदत महाविद्यालय घेत असल्याचे प्रतिपादन केले. विदर्भातील सर्वसामान्य विद्यार्थ्याला राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात टिकून राहण्याकरिता संवाद कौशल्य, भाषा प्रभुत्व, ऑप्टिटयूड ट्रेनिंग, इंटरव्ह्यू टेक्निक्स आदि बाबींवर द्वितीय वर्षापासूनच तयारी करून घ्यावी लागते.

विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितिनजी **धांदे**, उपाध्यक्ष **प्रो. विनय गोहाड**, कोषाध्यक्ष **श्री. पंकज देशमुख**, **सचिव श्री. युवराजसिंग चौधरी**, तसेच कार्यकारिणी सदस्य **प्रा. हेमंत एम. देशमुख, श्री. नितिन हिवसे, अ‍ॅड. उदय देशमुख, श्री. गजाननराव काळे, प्रा. रागिणी देशमुख, प्राचार्य डॉ. निशिकांत काळे** या सर्वांनी अभिनंदन केले व महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख भविष्यात उंचावत नेण्याविषयी आशावाद व्यक्त केला.

# मेघेच्या कॅम्पस प्लेसमेंट २०१५१६ मध्ये ३१२ विद्यार्थ्यांची भरारी

## गौरव : विविध मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये नियुक्ती



**अमरावती :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारे संचालित राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेंच्यावतीने आयोजित कॅम्पस प्लेसमेंट सन २०१५१६ मध्ये ३१२ विद्यार्थ्यांना विविध मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये नियुक्ती मिळली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य निशिकांत काळे यांच्या हस्ते शनिवारी गुणवान विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी सर्व विभागप्रमुख, प्लेसमेंट विभागाचे प्रभारी प्राध्यापक रवि हिरूळकर, श्रीकांत देशमुख, ए.डी. शिरभाते, मिलिंद मोहोड, अनुप बुरंगे, संग्राम दांडगे, स्मिता ठाकूर, प्रफुल्ल बागडे, निनाद गावंडे, देवेंद्र बांडाबुचे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता तुषार देशमुख उपस्थित होते. अहमर मलिक खान, अर्पिता वानखडे, दर्शना आखरे, गौरव जोशी, वृशाली भडके, अमिता जोशी, अभिजित दंदर, अक्षय फुसे, पूनम आमले, संकेत वांजळे, हरित कुळकर्णी, श्रध्दा बडोणे, हृषीकेश केदार, आकाश जवंजाळ, केवल दोशी, विक्रम भटकर या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमात विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष नितीन धांदे, उपाध्यक्ष विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य हेमंत देशमुख, नितीन हिवसे, उदय देशमुख, गजानन काळे, रागिनी देशमुख, प्राचार्य निशिकांत काळे यांचीदेखील उपस्थिती होती.



विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारा आयोजित कॅम्पस प्लेसमेंट कार्यक्रमात सहभागी झालेले झालेले विद्यार्थी.

# 'मेघे'च्या कॅम्पस प्लेसमेंट २०१५-१६ मध्ये ३१२ विद्यार्थ्यांची भरारी

## गौरव : विविध मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये नियुक्ती

**अमरावती :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीद्वारे संचालित राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेच्यावतीने आयोजित कॅम्पस प्लेसमेंट सन २०१५-१६ मध्ये ३१२ विद्यार्थ्यांना विविध मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये नियुक्ती मिळाली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य निशिकांत काळे यांच्या हस्ते शनिवारी गुणवान विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी सर्व विभागप्रमुख, प्लेसमेंट विभागाचे प्रभारी प्राध्यापक रवि हिरूळकर, श्रीकांत देशमुख, ए.डी. शिरभाते, मिलिंद मोहोड, अनुप बुरंगे, संग्राम दांडगे, स्मिता ठाकूर, प्रफुल्ल बागडे, निनाद गावंडे, देवेंद्र बांडाबुचे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता तुषार देशमुख उपस्थित होते. अहमर मलिक खान, अर्पिता वानखडे, दर्शना आखरे, गौरव जोशी, वृशाली भडके, अमिता जोशी, अभिजित दंदर, अक्षय फुसे, पूनम आमले, संकेत वांजळे, हरित कुळकर्णी, श्रध्दा बडोणे, हृषीकेश केदार, आकाश जवंजाळ, केवल दोशी, विक्रम भटकर या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रमात विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष नितीन धांदे, उपाध्यक्ष विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य हेमंत देशमुख, नितीन हिवसे, उदय देशमुख, गजानन काळे, रागिनी देशमुख, प्राचार्य निशिकांत काळे यांचीदेखील उपस्थिती होती.

(प्रतिनिधी)